1

# नियम व नियमावली

१) संस्थेचे नांव :- आधार फाउन्डेशन , गेवराई ता.गेवराई जि. बीड

२) संस्थेचा पत्ता :- प्लाट नं.३४, आर.बी.अट्टल कॉलेजच्यापाठीमागे, गेवराई जि.बीड

Inq.No. 17..

Exe.No. 0..

३) नियमातील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

१) सर्वसाधारण सभा :- सर्व प्रकारच्या सभासदांची मिळून झालेली सभा.

२) वि.सर्वसाधारण सभा :- महत्वाच्या कामी कारणासाठी अल्पमुदतीत बोलवलेली सभा.

३) कार्यकारी मंडळ :- पदाधिकारी व सर्वसाधारण सभेतून निवडून आलेले सभासद.

ज्या शब्दांच्या अर्थाचा वाद निर्माण होईल ठरविल.

४) संस्थेचे कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य

५) हिशोबाचे वर्ष :- हिशोबाचे वर्ष ३१ मार्च अखेर राहील.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड विभाग बीड
कॉपी मिळाल्याचा अर्ज दि.
कॉपी दिल्याचा दि. 5/8/15
छायांकित प्रत काढणाराची स्वाक्षरी

६) सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत :-

कोणताही व्यक्ती ज्याचे वय १८ वर्षावरील भारतीय स्त्री किंव खालील अटीचा वापर करून होता येईल.

१) ज्या व्यक्ती संस्थेचे सभासद होऊ इच्छित असतील त्यांना संस्थेचे ज्ञापन व नियम मान्य असले पाहीजेत व तसा नियम व ज्ञापन मान्य असल्याबाबतचा लेखी पुरावा अर्ज देणे अवश्यक आहे.

२) सभासदासाठी करावयाचा अर्ज हा लेखी स्वरूपात अध्यक्षाकडे दिला पाहीजे. आलेला अर्ज कार्यकारी मंडळासमोर ठेवून त्यावर होणारा निर्णय अध्यक्षानी संबंधिताला कळविला पाहिजे.

३) सभासदाचा अर्ज मंजूर किंवा नामंजुर करण्याचा अधिकार संपूर्णपणे कार्यकारी मंडळाला राहील.

४) सभासदाचा मिळाल्यानंतर त्याला कोणत्याही प्रकारचा सभासद होता येईल.

७) सभासदाचे प्रकार :-

या संस्थेचे खालीलप्रमाणे सभासदाचे प्रकार राहतील.

१) अजीव सभासद .

२) सर्वसाधारण सभासद

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

१) अजीव सभासद :-

कोणत्याही व्यक्तीला कलम ६ मधील अटी पूर्ण करून व रू. १०१/- वर्गणी भरूण या संस्थेचा अजीव सभासद होता येईल. त्याला पुन्हा वर्गणी भरावी लागणार नाही. तो या संसथेचा मरेपर्यंत सभासद राहील. त्याला अजीव सभासद होऊन ३ महिने पूर्ण झाल्यावर मतदान व निवडणूकीस उभे राहण्याचा अधिकार प्राप्त होईल.

२) साधारण सभासद :-

कोणत्याही व्यक्तीला कलम ६ मधील अटी पूर्ण करून व रू. ५१/- वार्षिक वर्गण भरून संस्थेचा साधारण सभासद होता येईल.त्यास ६ महिने झाल्यावर मतदानाचा व निवडणूकीस उभे राहण्याचा अधिकार प्राप्त होईल. त्याला प्रत्येक वर्षी ३१ मार्च संपल्यानंतर दोन महिन्याच्या आत सभासद वर्गणी भरावी लागेल. जर त्याने सभासद वर्गणी भरली नाही तर तो थकबाकीदारठरेल व त्याला वरील अधिकारापासून वंचित व्हावे लागेल. ही वर्गणी त्याचे ६ महिने पूर्ण होईपर्यंत भरली नाही तर त्याचे सभासदत्व रद्द झाले असे सभजले जाईल व त्याला पुन्हा सभासद होण्याचा अधिकार राहणार नाही.

**८) सभासदत्व रद्द करणे :-**

मुदतपुर्व सभासद वर्गणी न भरल्यास, मृत्यु पावल्यास, वेडा झाल्यास, लेखी नोटीस मिळूनही सतत तीन सभेला गैरहजर राहिल्यास, गाववेस सोडून तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी भारताबाहेर गेल्यास, फौजदारी खटल्यात गुन्हेगार ठरून शिक्षा झाल्यास, थकबाकीदार झाल्यास संस्थेची बदनामी होइल असे वर्तन केल्यास त्याचे सभासदत्व रद्द ठरविण्यात येईल.

**९) सर्वसाधारण सभा तिचे अधिकार आणि कार्य :-**

सर्व सभासदांची मिळून हि सभा बनेल. हि सभा सर्वश्रेष्ठ व शेवटी निर्णय देणारी सभा समजली जाईल.या सभेत कार्यकारी मंडळ निवडले जाईल. अंदाज पत्रकास मान्यता देणे, वर्षभर जमा खर्चास मान्यता देणे. अविश्वासास मंजुरी देणे, घटना बदल करणे, निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. हि सभा वर्षातून एकदा घेतली जाईल व सभेचा कोरम २/३ असा राहील. या सभेत घेतलेले निर्णय सर्वांवर बंदनकारक राहतील. ही सभा आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत बोलावली जाईल.

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

**१०) सर्व साधारण सभेची सूचना व गणसंख्या :-**

सर्व साधारण सभेची नोटिस १५ दिवस आगोदर काढण्यात येईल नोटीसमध्ये विषय, स्थळ, वेळ असणे आवश्यक आहे. नोटीसवर सर्व सभासदांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जातील किंवा सदर नोटीस सभासदांना १५ दिवस आगोदर रजिष्टर पोष्टाने पाठविण्यात येतील याची दक्षता घेतली जाईल. सदर सभेची गण संख्या १/२ सभासदां इतकी राहील, गणसंख्या अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासाने ती सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी होईल. अशा तहकुब सभेस कोरमची अट राहणार नाही.

**११) विशेष साधारण सभा :-**

अ) एखाद्या महत्वाच्या कामी किंवा २/३ सभासदांच्या लेखी मागणीवरून हि सभा बोलावली जाईल.या सभेस कलम १० प्रमाणे सर्व नियम लागु राहतील.

**१२) संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना :-**

या संस्थेचे कार्यकारी मंडळ खालीलप्रमाणे कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १५ सभासदांचे पदाधिकाऱ्यांसह राहील.त्यात

१) अध्यक्ष -१ २) उपाध्यक्ष - १ ३) सचिव -१ ४) सहसचिव - १

५)कोषाध्यक्ष -१ ५) बाकीचे सभासद राहतील.

**१३) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :-**

कार्यकारी मंडळाची निवड दर पाच वर्षाने सर्वसाधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने होईल. आवश्यकता भासल्यास सर्वसाधारण सभा निवडणूक कार्यक्रम ठरविल व त्याप्रमाणे निवडणूक प्रक्रिया घ्यावयाची आहे.

अ) निवडणूकीस अपात्र :-

थकबाकीदार कलम ७ (१ व २) ची पूर्तता होत नसेल तर कलम ६ प्रमाणे अपात्र ठरला असेल तर तो सभासद निवडणूकीस अपात्र ठरेल.

ब) निवडणूक अधिकाऱ्याने दिलेला निर्णय हा शेवटी व अंतीम समजला जाईल. त्यांना आव्हान करता येणार नाही. मात्र फेर मतमोजणी करता येईल. नवीन कार्यकारी मंडळाची निवड होईपर्यंत पहिलेच कार्यकारी मंडळ काम पाहिल.

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष** **सचिव**

१४) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

१) अध्यक्ष :-

सर्व प्रकारच्या सभांचे अध्यक्षस्थान स्विकारणे, सचिवाच्या कामावर नियंत्रण ठेवणे, सचिवाने सभा न बोलावल्यास त्याला लेखी कळविणे. सचिवास तीन वेळा लेखी कळवूनही सभा न बोलावल्यास स्वत:च्या अधिकारात सभा बोलावणे. समान मते झाल्यास एक जादा मत देण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील.

२) उपाध्यक्ष :-

अध्यक्ष यांच्या गैर हजेरीत त्यांची सर्व कामे करणे व सस्थेच्या इतर सर्व कामात सचिवांना मदत करणे. अध्यक्षांचे पद मध्येच रिक्त झाल्यास पुढील निवडणूकीपर्यंत उपाध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून कायदेशीर काम करतील व इतर सभासदांमधून उपाध्यक्षाचे पद भरले जाईल.

३) सचिव :-

संस्थेच्या सर्व प्रकारच्या सभा बोलावणे. सभेची नोटीस काढणे, सभेचा वृत्तांत लिहणे, हिशोब रोजच्या रोज लिहून त्यावर सह्या करणे, किर्द खतावणी लेजर व इतर सर्व रजिष्टर लिहणे. सभासद रजिष्टर स्थावर व जंगम रजिष्टर ठेवणे आलेली सभासद वर्गणी स्विकारून ती बँकेत भरणे. कार्यकारी मंडळाच्या संमतीने नोकरांच्या बदल्या, बढत्या, तात्पुरते कमी करणे किंवा घेणे मंजूर झालेले ठराव अंमलात आणणे. कोर्टकचेऱ्यांची सर्व कामे करणे, जमा खर्चाच्या पावत्या ठेवणे, संस्थेसाठी लागणारे फर्निचर स्टेशनरीची खरेदी करणे, संस्थेच्या सर्व मिळकतीवर व शाखांवर नियंत्रण ठेवणे. सभासदत्वासाठी आलेला अर्ज स्विकारून तो मंजुरस्तव कार्यकारी मंडळासमोर ठेवणे. अर्ज मंजूर झाल्यावर त्यास सभासद करून घेणे. संस्थेच्या हिताचे दृष्टीने सर्व प्रकारची कामे करणे. दैनंदिन खर्चासाठी १००/- रू. सचिवांना हातावर ठेवता येतील.

४) सहसचिव :-

सचिवाच्या गैरहजेरीत त्याची सर्व कामे करणे व संस्थेच्या इतर सर्व कामात मदत करणे. निवडणूकीपुर्वी कोणत्याही कारणाने सचिवाचे पद रिक्त झाल्यास सचिवाचे काम सहसचिव कायदेशीर करतील व भरून काढण्यात येईल.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

(५)

५) कोषाध्यक्ष :-

संस्थेच्या नावाने आलेली वर्गणी, देणगी स्विकारून बँकेत भरणे व पावत्या सचिवाकडे देणे. संस्थेच्या कार्यात सचिवास मदत करणे, संस्थेच्या खर्चासाठी सचिवास रक्कम देणे.

६) कार्यकारणीचे सभासद :-

संस्थेच्या कार्यात सचिवांना मदत करणे. प्रत्येक सभेस हजर राहणे, ठरावास मंजूरी देणे, मतदान करणे.

**१५) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-**

कार्यकारी मंडळाची सभा कमीत कमी वर्षातून तीन वेळा घेण्यात येईल. २/३ सभासदांची किंवा ७ पैकी ३ सभासदांनी लेखी सभेची मागणी सचिवाकडे केल्यास तशी सभा सचिव बोलाविल जर सचिवांनी सभा बोलावली नाही तर अध्यक्ष आपल्या अधिकारात मागणी केलेल्या विषयावरून सभा बोलावू शकतील. तसेच अध्यक्ष किंवा सचिव यांनी सभा बोलावली नाही तर मागणी करणाऱ्यापैकी एक सभा बोलावू शकतील अशा सभेस नियमीत सभेचे नियम लागु राहतील.

**१६) कार्यकारी मंडळाची सभेची सूचना व गणसंख्या :-**

कार्यकारी मंडळाची नोटीस लेखी आठ दिवस आगोदर काढण्यात येईल. कोणत्याही नोटीसा लेखी देऊन नोटीस बुकावर सभासदांची सही घेतली जाईल. सही न केल्यास रजिष्टर पोच पावतीने नोटीस पाठविण्यात येइल. नोटीसमध्ये वेळ, स्थळ,दिनांक, विषय दिलेले असतील. गणसंख्या २/३ इतकी राहील.

**१७) कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :-**

दर पाच वर्षाने कार्यकारी मंडळाची निवड सर्वसाधारण सभेत पदाधिकाऱ्यांसह होईल. कार्यकारणिसाठी निवडूण येण्यास उमेदवार संख्या जास्त असल्यास गुप्त मतदान पध्दतीने निवड करायची आहे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

## १८) कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत:-

अ) कार्यकारी मंडळातील कोणत्याही पदाधिकारी सभासदाचे पद कारणपरत्वे रिक्त झाल्यास ते पद राहीलेले कार्यकारी मंडळ बहुमताने पुढील निवडणूक होईपर्यंत भरतील. मात्र भरणारा सभासद/पदाधिकारी हा संस्थेचा सभासद असला पाहिजे.

ब) कोणत्याही सभासदाला राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्याने तो लेखी स्पष्ट व स्वत:ची सही करून सचिवाकडे द्यावा.सचिवाने आलेला अर्ज/राजीनामा कार्यकारी मंडळासमोर ठेवून त्यावर होणारा निर्णय त्यास कळवावा. जो पर्यंत राजीनामा मंजूर होत नाही तोपर्यंत ते पद रिक्त झाले असे समजले जाणार नाही.

## १९) कार्यकारी मंडळाचे कर्तव्य व अधिकार :-

अध्यक्ष, सचिव यांनी चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, संस्थेच्या इतर शाखांवर नियंत्रण ठेवणे,त्यावर जंगमचे संरक्षण करणे नोकर वर्गाची नियुक्ती करणे, नोकरास बढती देणे. त्यांना कामावरून कमी करणे, जमा खर्चास मान्यता देणे कार्यकारी मंडळाची सभा हि कमीत कमी चार महिन्यातून एक तरी घेतली जाईल किंवा वर्षातून तीन सभा घेतल्या जातील.

## २०) संस्थेचा निधी मिळकत व विनियोग :-

संस्थेचा निधी, मिळकत व विनियोग, संस्थेच्या ज्या कांही स्थावर व जंगम मिळकती किंवा घेतल्या जातील त्या सर्व संस्थेच्या मिळकती समजल्या जातील. संस्थेच्या नावाने मिळणाऱ्या देणग्या, अनुदान,वर्गणी ही संस्थेचे विनियोग समजले जातील व त्याचा विनियोग संस्थेच्या उद्देशाप्रमाणे सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळाच्या बहुमताने करण्यात येईल.

## २१) उदिष्ट निहाय खर्चाची तरतूद :-

संस्थेच्या उदिष्ट पूर्ततेसाठी महत्वाच्या उद्देश करण्यात येते.

१) क्रिडा मंडळ/सेवाभावी संस्था/वाचनालय ७० %

२) व्यवस्थापक १० %

३) इतर २० %

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष** **सचिव**

**२२) कर्ज किंवा ठेवी या संबंधी तरतूद :-**

संस्थेला आवश्यक असल्यास कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून/बँकेकडून कर्ज अगर ठेवी स्विकारता येतील. परंतु त्याकरीता मा.सहधर्मदाय आयुक्त,लातुर यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**२३) स्थावर मालमत्ता खरेदी करणे व विक्री करणे बाबतची तरतूद :-**

संस्थेच्या अनावश्यक मालमत्ता विकऱ्याचा अधिकार संस्थेला राहील. परंतु त्याकरीता मा. सहधर्मदाय आयुक्त,लातुर यांची पूर्व परवानगी घेउन स्थावर मालमत्ता विक्री करता येईल.

**२४) बँक खाते :-**

संस्थेच्या नावावर सरकार मान्य बँकेत खाते राहील. बँकेतून रक्कम काढण्याचा अधिकार अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष या तिघांपैकी दोघांचे संयुक्त सहीने राहील.

**२५) सभासदाची यादी ठेवण्याची पध्दत :-**

सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियमामध्ये उल्लेखलेल्या अनुसुचि १,२ व ७,६ चे स्वतंत्र नमुन्यात रजिष्टर मध्ये नोंद ठेवण्यात येईल.

**२६) नियम व नियमावलीत बदल करावयाची तरतूद :-**

संस्थेची घटना किंवा नियम व नियमावलीतील बदल करावयाचा झाला अथवा नवीन नियम घालणे किंवा जुने कमी करावयाचे झाल्यास त्याची दुरूस्ती सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या २/३ बहुमताने सुधारणा करता येईल.

**२७) संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतूद :-**

संस्थेच्या नावात बदल किंवा उद्देशात बदल करावयाचा झाल्यास तो सोसायटी रजिष्ट्रेशन कायदा १८६० चे कलम १२ व १२ अ प्रमाणे करण्यात येईल.

**२८) विसर्जन :-**

संस्थेचे कार्य बंद पडल्यास अगर ती बंद करावयाची असल्यास सोसायटी रजिस्ट्रेशन कायदा १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| Bmore | बबन मोरे | [signature] |

# दाखला

दाखला देण्यांत येतो की, आधार फाउन्डेशन , गेवराई ता.गेवराई जि. बीड यासंस्थेच्या नियम व निर्बंधाची ही खरी व बरोबर प्रत असुन या नावाची दुसरी संस्था या गावात अद्याप नोंद झालेली नाही.

| अ.क्र. | सभासदाचे नांव | पद. | सही. |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वर्षा भगवान मोटे | अध्यक्ष | |
| २ | श्री. बबन रामभाउ मोटे | उपाध्यक्ष | बबन मोटे |
| ३ | डॉ. भगवान रामभाउ मोटे | सचिव | |
| ४ | डॉ. वैभव ज्ञानेश्वर गवारे | सहसचिव | |
| ५ | श्री. अमोल राजेंद्र जाधव | कोषाध्यक्ष | |
| ६ | डॉ. मुरलिधर कन्हुसिंग जाधव | सभासद | |
| ७ | डॉ. विशाल महादेव चौरे | सभासद | |

प्रमाणीत प्रत

02 APR 2018

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बीड विभाग बीड

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

बबन मोटे

1

१४३

Inq. No
Exe. No

# ज्ञापन

अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड विभाग बीड
नक्कल मिळाल्याचा अर्ज दि. 5/2/8/92
नक्कल दिल्याचा दि.

१) संस्थेचे नांव :- आधार फाउन्डेशन , गेवराई ता.गेवराई जि. बीड

२) संस्थेचा पत्ता :- प्लाट नं.३४, आर.बी.अट्टल कॉलेजच्यापाठीमागे, गेवराई जि.बीड

३) संस्थेचे उध्देश :-

१ ग्रामिण व शहरी भागात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे म्हणजेच बालवाडी, अंगणवाडी, राज्यगृह पाळणागृह, बालसदन, बालकाश्रम, शिशुविहार, युवक कल्यान केंद्र, बालगृह, बहुउद्देशीय सामुहिक केंद्र, बाल मार्गदर्शन चिकीत्सा केंद्र, बालसंगोपन योजना, दत्तक योजना, शिशुगृह, राष्ट्रीय शिशुकक्ष,विधालय स्थापन करणे व चालविणे व प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणे.

२ ग्रामिण व शहरी भागात सर्व प्रकारेचे कनिष्ट व वरिष्ठ महाविद्यालय,डी.एड.,बी.एड बी.पी.ड एम.एड,विधी महाविद्यालय,मेडिकल,पॅरामेडीकल कॉलेज, होमिओपॉथी, ॲलोपॅथी, आयुर्वेदीक कॉलेज स्थापण करणे व चालविणे, इंजिनिअरिंग कॉलेज, आय.टी.आय.,पॉलिटेक्नीकल कॉलेज, फार्मसी, चित्रकला, संगित कॉलेज, पोष्ट बेसिक, सैनिकशाळा, वस्तीशाळा, निवासी, अनिवासी वसतीगृह, गुरुकुल,समाजिक व अर्थिक विकासासाठी औधोगिक,व्यवसायिक,तंत्रशिक्षण, व्यवस्थापन शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्थापन करणे व चालविणे.आरोग्य शिबीरे,लसीकरणसत्र, चर्चासत्र परिसंवाद, नर्स प्रशिक्षण केंद्र व नर्सींग महाविद्यालय, अरोग्य प्रयोगशाळा कृषी संशोधन त्यासाठी औपचारीकव अनौपचारीक शिक्षण देणे.शिबीरे, विकासासाठी औद्‌ओगिक , प्रशिक्षण संस्था स्थापन करणे. मराठी, इंग्रजी उर्दु, भाषेचा प्रचार करणे.

३ निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षरोपण करणे व त्यासाठी जलसंधारणाची कामे करणे,शासकीय योजना राबवीणे.

४ आपदग्रस्तांना मदत करणे.

५ जलसंवर्धनची कामे करणे, पाणी आडवा पाणी जीरवा योजणा राबविणे.

६ सकल मानवी संस्कृतीची विविध मार्गानी सर्व धर्म समभाव मानुन नैतीक मूल्यांची जोपासना करणे.

७ उसतोड कामगाराच्या मुलांसाठी वस्तीगृहे, आश्रमशाळा, हंगामी वस्तीगृह स्थापन करणे व चालविणे.

८ ग्रामिण व शहरी भागात कृषी संस्था स्थापण करणे व चालविणे.

९ महिला व बाल विकास विभागाच्या सर्व योजना राबविणे महिलांच्या विकासासाठी व राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी महिलांना मिरची पावडर, हळद कांडण पिठाची चक्की आदी उदोग उभारण्यास मदत करणे.

१० महिलाश्रम, विधवाश्रम, विधुराश्रम, अनाथश्रम स्थापन करणे व चालविणे.

११ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालविणे.

१२ व्यसन मुक्ती केंद्र स्थापन करणे व चालविणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

१३ माहिती व तंत्रभान व संगणकीय प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे व चालविणे.

१४ बोर्डाच्या सर्व योजना राबविणे. कपार्ट, नाबार्ड, नोरॉल्ड योजना राबविणे.

१५ शेतकऱ्यांना विविध बियाणांची माहिती करुण देणे.

१६ सामाजिक उद्देश :- पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अशिक्षीत बालकामगारांसाठी सामुहिक जिवन विमा व अन्य विमा योजना राबविणे. अंधश्रध्दा निर्मुलन, महीला सुधारगृहे, अंध अपंगत्वासाठी शाळा चालविणे.

१७ ग्रामीण भागातील दारिद्र रेषेखालील महिला व मुलींसाठी रोजगार उपलब्ध करुन त्यांना उपजिवीकेच्या साधनांची पुर्त

१८ ग्रामिण व शहरी भागात आरोग्य अबाधित राहण्यासाठी ग्रामीण रुग्णालय धर्मार्थ दवाखाने, फिरते दवाखाने (मोबाईल) स्थापन करणे व चालविणे.

१९ ग्रामिण व शहरी भागातील विविध महिला, पुरुष व नवयुवक मुला मुलींना होणाऱ्या रोगाचा प्रचार करणे. आरोग्य विषयक माहिती देणे. नेत्रदान शिबीर, रक्तदान शिबीरे, रुग्णावाहीका ची व्यवस्था करणे. काविळ, अॅथ्रक्स विषाणु पासुन होणारा रोगाचा प्रसार कमी करण्यासाठी मार्गदर्शन शिबीर घेणे व रोग्याविषयी माहित

२० रक्त पेढी (ब्लड बँक) स्थापन करणे व चालविणे.

२१ कन्या शाळा, महिला विधालय स्थापन करणे व चालविणे.

२२ टंकलेखन संस्था स्थापन करणे व चालविणे.

२३ व्यवसायीक अभ्यास क्रमाचा प्रसार व प्रचार करणे.

२४ अस्थिव्यंग, अंध, मुकबधीर, मतिमंद विधालय स्थापन करणे व चालविणे.

२५ गोशाळा स्थापन करणे व चालविणे.

२६ ~~कॉटर अॅफो अफार्म~~ महिला आर्थीक विकास महामंडळ या अंतर्गत येणाऱ्या सर्व योजणा राबविणे.

~~२७ महिलांना ब्युटीपार्लर, सार्वत्रिक स्वस्थ योजनेअंतर्गत महिला स्विकार गृहामध्ये मुलींना~~

~~२८ विवाहासाठी आर्थीक सहाय्य करणे.~~

२९ महाराष्ट्र राज्य कल्याण, सल्लागार बोर्ड मुंबई व केंद्रीय सल्लागार बोर्ड दिल्ली यांचे महिला विषयक धोरण राबविणे.

३० अनिवासी शाळा स्थापन करणे व चालविणे.

३१ रात्रीच्या शाळा काढणे व शिवणक्लास वर्ग राबविणे.

३२ नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वस्तीगृह स्थापन करणे व चालविणे.

३३ महिला बचत गट स्थापन करणे व चालविणे.

३४ निराश्रीत विधवांच्या मुलीसाठी विवाह अनुदान देणे.

३५ देवदासी निर्वाह अनुदान देणे, देवदासी किंवा तिच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान देणे, देवदासींच्या आर्थीक पुनर्वसनासाठी व्यवसायिक प्रशिक्षण देणे, देवदासी किंवा तिच्या मुलींच्या वस्तीगृहे सुरु करणे सरंक्षण गृहे स्थापन करणे.

३६ सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रम आयोजीत करणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

३७ गावात व परिसरात मुला - मुलींना व व्यक्तीना गायन व वादन शिकविणे.

३८ महिला व पुरुष आर्थीक कोष कल्याणकारी योजना राबविणे.

३९ मत्सोधोग प्रशिक्षण देणे.

४० कामधेनु योजना चालविणे.

४१ सैनिक शाळा स्थापन करणे व चालविणे.

४२ कुपोषीत बालकांचे सर्वेक्षण करुन त्यांची आहार वनवास, वस्त्र इ. सोय करणे.

४३ बालगुन्हारासाठी शैक्षणिक सांस्कृतीक व क्रीडा विषयक योजनाराबवुन बालगुन्हारांचे जीवनमान

४४ निवासी, अनिवासी वस्तीगृहे, गुरुकुल स्थापन करणे व चालविणे.

४५ दिशाहीन तरुणांना दिशा देउन त्यांच्यातील व्यवसनाधिनता कमी व्हावी म्हणुन कार्यक्रम राबविणे.

४६ लहानमुलांसाठी निवासी शाळा चालविणे.

४७ स्पर्धा परीक्षेचे ~~आयोजन करणे~~ व कार्यशाळा चालविणे.

४८ दलित, आदिवासी भटक्या, ववमुक्त सर्वांगीन विकासासाठी शासकीय योजना राबविणे.

४९ माजी सैनिक यांच्या पाल्यांसाठी वस्तीगृहे शाळा स्थापन करणे व चालविणे.

५० वराह पालन, कुक्कटपालन, शेळी पालन, मेंढी पालन, शामृग पालन प्रशिक्षण देणे.

५१ पशु पक्ष्यांचे पालण, संगोपण करणे त्यांच्यासाठी वैध्यकीय मदत, पाणी चारा याची सोय उपलब्द करणे.

५२ चारा डेपो उघडणे, जनारांच्या छावण्या उघडणे.

५३ सौर उर्जा विषयी जनजागृती करणे,सौर उर्जा उपक्रम राबविणे.

५४ प्ले स्कुल अॅकॅडमी, व्यवसाय शिक्षण व क्रिडा शिक्षण देणे.

५५ औषधी वनस्पतीची लागवड करणे व नर्सरी चालविणे.

५६ किशोर वयीन मुलांसाठी विवीध सहासी उपक्रम राबविणे.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
| --- | --- | --- |

४) आधार फाउन्डेशन , गेवराई ता.गेवराई जि. बीड

प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था व कार्यभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपुर्ण नावे, वय, पत्ते, हुद्दे व व्यवसाय व राष्टीयत्व खालील प्रमाणे आहे. या संस्थेच्या नियम व नियमावली

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा | पत्ता | वय | व्यवसाय | राष्टीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. वर्षा भगवान मोटे | अध्यक्ष | आर.बी.अट्टल कॉलेजच्यापाठीमागे, गेवराई | ३२ | वैद्यकीय | भारतीय |
| २ | श्री. बबन रामभाउ मोटे | उपाध्यक्ष | रा. गंगवाडी, गेवराई | ४० | शेती | भारतीय |
| ३ | डॉ. भगवान रामभाउ मोटे | सचिव | आर.बी.अट्टल कॉलेजच्यापाठीमागे, गेवराई | ३४ | वैद्यकीय | भारतीय |
| ४ | डॉ. वैभव ज्ञानेश्वर गवारे | सहसचिव | शहर टाकळी, शेवगाव जि.अहमदनगर | ३२ | वैद्यकीय | भारतीय |
| ५ | श्री. अमोल राजेंद्र जाधव | कोषाध्यक्ष | रा. विहामांडवा, ~~गेवराई~~ ता. पैठण जि. औरंगाबाद | २२ | शेती | भारतीय |
| ६ | डॉ. मुरलिधर कन्हुसिंग जाधव | सभासद | कोर्ट रोड , अंबड जि. जालना | ३४ | वैद्यकीय | भारतीय |
| ७ | डॉ. विशाल महादेव चौरे | सभासद | माहाकाळा , अंबड जि. जालना | ३४ | वैद्यकीय | भारतीय |

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

5

# घोषणापत्र

५) आम्ही खालील सह्या करणारे **आधार फाउन्डेशन , गेवराई ता.गेवराई जि. बीड** या संस्थे सभासद जाहिर करतो की , संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात अणण्याची आमची ईच्छाअसुन वरील उध्देशान आम्ही एकत्र येवून **आधार फाउन्डेशन , गेवराई ता.गेवराई जि. बीड** ही संस्था आज दिनांक 20/06/ रोजी स्थापनकेली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्या साठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.क्र. | सभासदाचे नांव | पुर्ण पत्ता | सही. |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वर्षा भगवान मोटे | आर.बी.अट्टल कॉलेजच्यापाठीमागे, गेवराई | [signature] |
| २ | श्री. बबन रामभाउ मोटे | रा. गंगवाडी, गेवराई | [signature] |
| ३ | डॉ. भगवान रामभाउ मोटे | आर.बी.अट्टल कॉलेजच्यापाठीमागे, गेवराई | [signature] |
| ४ | डॉ. वैभव ज्ञानेश्वर गवारे | शहर टाकळी, शेवगाव जि.अहमदनगर | [signature] |
| ५ | श्री. अमोल राजेंद्र जाधव | रा. विहामांडवा, ~~गेवराई~~ ता. पैठण जि. औरंगाबाद | [signature] |
| ६ | डॉ. मुरलिधर कन्हुसिंग जाधव | कोर्ट रोड , अंबड जि. जालना | [signature] |
| ७ | डॉ. विशाल महादेव चौरे | माहाकाळा , अंबड जि. जालना | [signature] |

ठिकाण :- बीड

वरील सर्व सह्या मी ओळखते त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

ॲड.पी.आर.गलथर
(बी.ए.एल.एल.बी.)
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
वकिलाची सही, शिक्का व पत्ता.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|
| [signature] | बबन मोटे | [signature] |